# श्रीगुरुमाईंच्या वचनांवर ध्यान

## ईशा सरदेसाई यांच्याद्वारे लिखित

### तुमच्या अंतरी विद्यमान असलेला भगवंताचा प्रकाश

सत्संगामध्ये श्रीगुरुमाईंनी वर्ष २०२६च्या आपल्या संदेशाच्या शेवटच्या ओळीत असलेल्या एका वाक्यांशाचा उल्लेख केला : *तुमच्या चेतनेला प्रबुद्ध करा.* त्यावेळी श्रीगुरुमाईंनी या गोष्टीवर भर दिला होता की, हा वाक्यांश अतिशय महत्त्वाचा आहे आणि त्यांचे ते शब्द अजूनही माझ्या अंतरी झिरपत आहेत. या विषयावरील श्रीगुरुमाईंच्या शिकवणींबद्दलचे माझे प्रारंभिक विचार अनेक आणि विविध आहेत, परंतु ते सगळेच विचार मी इथे व्यक्त करणार नाही.

तथापि, श्रीगुरुमाईंच्या त्या एका शिकवणीवर मी केंद्रण करेन, जी त्यांनी त्यांच्या संदेशाच्या या ओळीविषयी बोलताना प्रदान केली होती. श्रीगुरुमाई म्हणाल्या होत्या : “तुम्ही स्वतःला कमी लेखावे असे कोणीही तुम्हाला सांगत नाही. तुम्ही भगवंताचा प्रकाश होण्यासाठीच जन्माला आला आहात आणि तुम्ही भगवंताचा प्रकाश *आहात.*”

श्रीगुरुमाईंनी हा सत्संग मकरसंक्रांतीच्या दिवशी केला होता, म्हणजे त्या दिवशी केला जेव्हा आपण सूर्याची आराधना करतो आणि एका अशा ऋतूच्या आगमनाचा उत्सव साजरा करतो की, जेव्हा उत्तर गोलार्धात प्रकाश वाढू लागतो. श्रीगुरुमाईंच्या शिकवणीवर चिंतनमनन करत असताना, मला आठवते आहे की, श्रीगुरुमाईंनी सूर्याची उपमा देऊन आपल्याला ही गोष्ट सखोलतेने समजावली होती की, आपण भगवंताच्या प्रकाशाचे विस्ताररूप आहोत. आपल्या प्रवचनांमध्ये आणि आपल्या कवितांमध्ये श्रीगुरुमाईंनी म्हटले आहे की, आपल्यापैकी प्रत्येकजण सूर्याच्या एका किरणासमान आहे, जो किरण महाशक्तिमान सूर्यामधून बाहेर पडून सर्वत्र प्रसरित होतो. ही एक अशी प्रतिमा आहे की, जी आश्वासन देते आणि त्याबरोबरच ती ज्ञानप्रदही आहे, जी आपल्याला या गोष्टीची खातरी देते की, भगवंताचा प्रकाश शाश्वत रूपाने आपल्या अंतरी विद्यमान आहे. याचा अर्थ असाही होतो की, ज्या अर्थी आपण या प्रकाशाने संपन्न आहोत, त्या अर्थी इतरांना हा प्रकाश देण्याची तसेच जगाशी होणाऱ्या आपल्या संपर्क-संवादांच्या माध्यमातून हा प्रकाश झळकू देण्याची क्षमता आपल्यामध्ये आहे *आणि* ते आपले उत्तरदायित्वदेखील आहे.

म्हणून मी तुम्हाला विचारू इच्छिते : तुम्ही तुमच्या अंतरी सूर्याचा प्रकाश कशा प्रकारे अनुभवला आहे? जगाला तुमचा प्रकाश दिल्याबद्दल तुम्ही स्वतःची प्रशंसा केली आहे का, स्वतःला धन्यवाद दिले आहेत का?



© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.